| | |
|---|---|
| MHWS090010382021 | दाखल दिनांक : २७.०८.२०२१<br>नोंदणी दिनांक : २७.०८.२०२१<br>निकाल दिनांक : १३.०५.२०२६<br>कालावधी : **०४** व., **०८.**, **१६** दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. १२९/२०२१** **निशाणी क्र.– १०१**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : १०/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | गजानन प्रल्हादराव वानखडे व इतर |
| आरोंपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. डी. ए. चव्हाण |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०८/०१/२०२१ ते ... |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०८/०१/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १९/०८/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | २०/०९/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ११/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | **गजानन प्रल्हादराव वानखडे**<br>वय : २९ वर्षे, धंदाः मजुरी<br>**ताई प्रल्हादराव वानखडे**<br>वय :६१ वर्षे, धंदाः मजुरी<br>**प्रल्हादराव परसराम वानखडे**<br>वय : ६५ वर्षे, धंदाः मजुरी<br>सर्व रा. गिराटा, ता. मानोरा, जि.वाशिम. | कलम ४१(१) सी.आर.पी सी. प्रमाणे समजपत्र दिले. | --<br>--<br>--<br>-- | भा.दं.वि. चे कलम ४९८, (अ), ३२३, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक १३/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८,(अ), ३२३, ५०६ सह कलम ३४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

**२.** फिर्यादी ही आ.क्र.१ ची पत्नी असुन इतर आरोपी हे आ.क्र.१ चे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत दि. २७/०४/२००९ मध्ये गा्रम–गिराटा येथे संपन्न झाले. लग्नाच्या काही दिवसानंतर आ.क्र.१ तिच्यावर संशय घेवून तिला नेहमी मारहाण करीत होता. आरोपीपासून तिला दोन मुले झाले. वर्ष २०१३ मध्ये आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे ती माहेरी आली होती. नंतर आ.क्र.२ व ३ ने समजुत घालून तिला पुन्हा नांदावयास नेले होते. त्यानंतर ती आ.क्र.१ सोबत नागपुरला कामाकरीता गेली होती. तेथेही आरोपी तिला मारहाण करुन शिवीगाळ करीत होता व माहेरवरुन रुपये ५० हजार मोटर सायकल घेण्यासाठी मागणी करीत होता. त्याकारणावरुन आरोपी तिला शारिरीक व मानसिक त्रास देत असून पैसे घेवून

आली नाही तर जीवाने मारुन टाकू अशी धमकी दिली होती. त्या अनुषंगाने फिर्यादीने मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र.१०/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८,(अ), ३२३, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८,(अ), ३२३, ५०६ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.२१ वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र. २२ ते २४ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकूण पाच साक्षीदार, सा.क्र.१ सुधाकर वामन वानखडे (पंच) यांना नि.क्र.३२ वर, सा.क्र.२ पार्वताबाई पंजाबराव ससाणे (फिर्यादीची आई) यांना नि.क्र.४० वर, सा.क्र.३ पंजाब मोतिराम ससाणे (फिर्यादीचे वडील) यांना नि.क्र.४१ वर, सा.क्र.४ गणेश पंजाबराव ससाणे (साक्षीदार) यांना नि.क्र.४२ वर, सा.क्र.५ रंजना गजानन वानखडे (फिर्यादी) यांना नि.क्र.५२ वर तपासले आहे. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठलेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्यानंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नि.क्र. ९६ ते ९८ वर नोंदविण्यात आले.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वि.स.अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादीने तिच्या साक्षेमध्ये पुरक असा पुरावा दिलेला आहे. याउलट आरोपींचे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रकरणात आरोपींच्या विरुद्ध आरोप सिद्ध झालेला नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे इतर स्वतंत्र साक्षीदारांचे बयाण नोंदविण्यात आले नाही. त्यामुळे वर नमुद कलमांकरीता आरोपींना दोषी ठरविता येणार नाही.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपींचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि. ०८/०१/२०२१ च्या पुर्वीपर्यंत ग्राम–गिराटा, ता. मानोरा जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमत करुन फिर्यादी हिचेकडे रुपयाची मागणी करुन तिचा शारिरीक, मानसिक छळ करुन तिला क्रुर वागणुक दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ) सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीला इच्छापुर्वक मारहाण करुन दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–**

**७.** सा.क्र.५ ही या प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार आहेत. त्यांनी नि.क्र.५४ वर असे कथन केले की, आ.क्र.१ ने तिला पहिले छळ करुन पाप लावले व नंतर शारिरीक व

मानसिक छळ केला, मारहाण करुन उपाशी ठेवले व रुपये ५० हजार माहेरवरुन आणून दिले नसल्याने तिला घरातून मारहाण करुन काढून दिले. आरोपींनी तिला शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे तिने तक्रार नि.क्र.५५ व ५८ प्रमाणे दाखल केली. सा.क्र.२, ३ व ४ फिर्यादीचे आई–वडील, भाउ असून त्यांनीही घटना फिर्यादीने कथन केल्याप्रमाणे घडल्याचे सांगितले. पुढे त्यांनी घटनेबाबत फिर्यादीकडून कळाल्याचे सांगितले. सा.क्र.१ प्रकरणातील पंच साक्षीदार असून त्यांनी त्यांचेसमक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे सांगितले.

८. अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्म अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीच्या साक्षेस सा.क्र.२ ते ४ यांनी पाठींबा दिलेला आहे. परंतु त्यांची साक्ष ऐकिव स्वरुपाची असून त्यांचेसमक्ष प्रत्यक्ष घटना घडली नसल्याने त्यांची साक्ष केवळ फिर्यादीच्या साक्षेस दुजोरा मिळणे हेतु लक्षात घेता येईल. प्रकरणात फिर्यादी साक्षीदाराने घटनेची दिनांक व वेळ विशेष करुन स्पष्ट असे सांगितले नाही. तसेच अभियोगपक्षाने फिर्यादीला झालेल्या दुखापतीबाबत योग्य तोंडी व कागदोपत्री वैद्यकिय पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच प्रकरणात अभियोगपक्षातर्फे पुरेपुर संधी देवूनही तपास अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या पुरक पुराव्या अभावी कथित घटनेची बाब निसंदेहपणे सिद्ध झालेली नाही.

९ अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन कथीत घटनेचे दिवशी व वेळी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी हिचेकडे रुपयांची लाखची मागणी करुन तिची शारिरीक व मानसिक छळ करुन मारहाण केली व जीवाने मारण्याची धमकी दिल्याची बाब फिर्यादी व इतर साक्षीदारांचे पुरक पुराव्या अभावी सिद्ध झालेली नाही. गुन्ह्याचे घटक सिद्ध करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपींवरील दोष सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**

**१०**. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०६, सह कलम ३४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आ.क्र.१ **गजानन प्रल्हादराव वानखडे,** आ.क्र.२ **ताई प्रल्हादराव वानखडे व** आ.क्र.३ **प्रल्हादराव परसराम वानखडे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ४९८–अ, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

४. न्यायनिर्णयाची प्रत मा. उच्च न्यायालयाचे Cr.A. No. 126/2020 मधील आदेशाचे पुर्ततेकामी जिल्हा अधिकारी, वाशिम यांचेकडे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.13 18:18:01 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
( न्यायालय क्र.२), मानोरा,

दि. १३/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | – | Smt. R. K. Chavhan (Grade–III) |
| Court | – | Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | – | 13/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | – | 13/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | – | 13/05/2026 |